**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
**दुरध्वनी क्र.** : 0253-2461439 **ईमेल** : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
**विभागाचे नाव: नियोजन शाखा** **संकलन: कुंभमेळा**

---

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- नाशिक- त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन 2027-28 अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. अध्यक्ष जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 15 एप्रिल, 2025 रोजी दुपारी 04.00 वाजता, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा सन 2027-28 अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त या सोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे. ही विनंती.

आपला विश्वासू,

Signed by Yogendra Ashok Chaudhari
Date: 22-04-2025 09:19:56

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक.

**जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिकच्या बैठकीचे इतिवृत्त.**

दिनांक- 15 एप्रिल 2025, वेळ दुपारी 04:00 वाजता.

स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.

बैठकीचे अध्यक्ष- डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकी दरम्यान विविध मुद्यांवर चर्चा झाली. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| | **सर्वसाधारण सुचना** | |
| 1 | सन 2027 मध्ये नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाअंतर्गत प्रस्तावित केलेली कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी आपआपल्या प्रशासकीय विभागांकडे पाठपुरावा करावा. | सर्व विभाग |
| 2 | नाशिक महानगरपालिकेने नाशिक येथे व त्र्यंबकेश्वर नगर परिषदेने त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत पिण्याच्या पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यासाठी आणि इतर अनुषंगिक कामांचा बैठकीत प्रस्ताव सादर केला. यास अनुसरुन सदर प्रस्तावांना जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीची मान्यता देण्यात आली. बैठकीत मान्यता देण्यात आलेल्या प्रस्तावांना शासनाची मान्यता घेण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात यावे. दरम्यानच्या काळात तांत्रिक मान्यतेनंतर तत्काळ निविदा प्रक्रीया सुरू करुन पुरवठा आदेश पर्यंत प्रक्रिया पार पाडण्यात यावी. | नाशिक महानगरपालिका<br><br>नप त्र्यंबकेश्वर |
| 3 | नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे निश्चित करण्यात आलेल्या घाटांच्या कामांना जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीची मान्यता घेण्यासाठी जलसंपदा विभागाने प्रस्ताव सादर केले. सदर घाट करतांना नदीचे पात्र अतिक्रमित न होता केवळ काठावर बांधले जातील, ते सुशोभित आणि स्थानिक सांस्कृतिक व धार्मिक बाबींशी सुसंगत राहतील तसेच पर्यावरण दृष्ट्या सुसंगत असतील या अटींवर सदर प्रस्तावास जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समितीची मान्यता देण्यात येईल. अशा प्रकारे पूर्तता करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावेत. | जलसंपदा विभाग |

| अ.क्र | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| 4 | सार्वजनिक बांधकाम विभाग कुंभमेळयासाठी आवश्यक असलेल्या त्यांचे कार्यक्षेत्रातील मोठ्या रस्त्यांच्या कामांचे कामनिहाय प्रस्ताव बैठकीत सादर केले. या बाबत विभागाने प्रस्तावित कामांबाबत तांत्रिक सादरीकरण करावे. | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 5 | नाशिक ग्रामीण पोलीसांनी कुंभमेळयासाठी आवश्यक असलेल्या सामग्री खर्चाच्या अंदाजपत्रकाचे सादरीकरणे केले. सदर अंदाजपत्रकातील सामग्रींची संख्या ही मर्यादीत व त्यांची किंमत ही कमी ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सादरीकरणामध्ये नविन इमारतींच्या बांधकामांचा समावेश करण्यात आला होता. याबाबत पोलीस विभागाने त्यांचे अधिकारी व कर्मचारी यांना राहण्याची व्यवस्था करण्यासाठी नाशिक शहर, त्र्यंबकेश्वर शहर व परिसरात मोठया प्रमाणावर रिक्त असलेले फलॅटस, मंगलकार्यालये भाडेतत्वार घ्यावेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या ना-दुरूस्त स्थितीत रिक्त असलेल्या वसाहतींची दुरूस्ती करून त्या पोलिसांना उपलब्ध करून देता येईल.पोलिसांना राहण्याची सोय करण्यासाठी प्रयागराजच्या धर्तीवर तात्पुरत्या स्वरूपाच्या निवारा तंबूच्या पर्यायांचा वापर करण्यात यावा. सदर बाबींचा अंतर्भाव करूनच अंदाजपत्रक फेरसादर करण्यात यावे. एकंदरित प्रस्ताव कुंभमेळ्याच्या आवश्यकतेनुसारच असावेत. | नाशिक ग्रामीण पोलीस<br>सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 6 | सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर शहरात व परिसरात अस्तित्वात असलेल्या कुंडांचे पुनरुज्जीवन करावे. तसेच त्र्यंबकेश्वर शहरातील व परिसरातील महत्वाच्या रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात यावे व घाटांच्या विकासासाठी master plan तयार करावा. त्र्यंबकेश्वर शहराच्या बाहेरील परिसरामध्ये असलेल्या महत्त्वाच्या मंदिरांचा व परिसराचा तसेच कुंडांचा विकास करण्यासाठी सर्वंकष आराखडा तयार करण्यात यावा व सदरच्या कामांची अंदाजपत्रके सादर करावीत. त्याचप्रमाणे नदी कायमस्वरुपी प्रवाही राहण्यासाठी उपलब्ध योजना आणि/ किंवा इतर पर्याय तपासून प्रस्ताव द्यावेत. आराखडा तयार करीत असतांना नाशिकच्या रामकालपथ प्रमाणे करण्यात आलेला सखोल अभ्यास दिसून येत नाही. त्याबाबत detailing अपेक्षित असून प्रत्येक प्रकल्पांसाठी संभाव्य पर्याय सल्लागाराने देणे अपेक्षित आहे.<br>त्र्यंबकेश्वर नगर परिषदेने पाणीपूरवठा व स्वच्छता बाबतच्या सर्व कामांची अंदाजपत्रके तयारु करुन कामे लवकरात लवकर सुरु करावीत व सिंहस्थ कुंभमेळ्यापूर्वी पूर्ण करावीत. सदरची कामे व इतर विकास आराखडा तयार करताना शासनाकडून मंजुर करण्यात आलेल्या इतर आराखड्यांचा देखील अभ्यास करावा. | नप त्र्यंबकेश्वर |

| अ.क्र | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| 7 | ब्रम्हगिरी प्रदक्षिणा पथ व ब्रम्हगिरी पर्वतावर करावयाची कामे जसेकी छोटा फेरी मार्ग, मोठा फेरी मार्ग, अंजनेरी व हरीहर गडांचा विकास इ. कामांचा विस्तृत खर्चासहित सादरीकरण करण्यात यावे. | वन विभाग (पश्चिम) |
| 8 | विदयुत विभागाने प्रस्तावित केलेल्या 4 वीजपुरवठा उपकेंद्रांपैकी (कावनाई सोडून) 3 उपकेंद्रांच्या कामांच्या प्रशासकिय मान्यतेसाठी व निधी मागणीसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. | MSECDL |
| 9 | जलसंपदा विभाग यांनी तळेगांव धरणातून पाणी उपसा करण्यासाठी 1 वीज उपकेंद्र (power substation) ची मागणी केली. MSECDL यांनी जलसंपदा विभाग यांच्याशी चर्चा करून आपल्या अंदाजपत्रकात त्याचा अंतर्भाव करावा. | MSECDL<br>जलसंपदा विभाग |
| 10 | CCTV नियंत्रण कक्षामध्ये SocialMedia व्दारे येणा-या तक्रारींचे निवारण करण्यासाठी Command & Control Room मध्ये अंतर्भाव करावा. जेणेकरून नागरिकांच्या दैनंदिनी येणाऱ्या तक्रारींचा निपटारा करता येईल. | NMSCDCL |
| 11 | गुणनियंत्रण प्रणालीबाबत प्रयागराज येथील कुंभमेळयात काम केलेल्या TUV या संस्थेबरोबर व्हिसी द्वारे चर्चा व सादरीकरण E&Y यांनी केले. याबाबत E&Y यांनी TUV या संस्थेकडून प्रयागराज कुंभमेळयासाठी गुणनियंत्रणाचे काम देण्यासाठी अवलंबिलेली निविदा प्राप्त करून सार्वजनिक बांधकाम विभाग व नाशिक महानगरपालिका यांच्या गुणनियंत्रण पथकासोबत अभ्यास करून अहवाल सादर करावा. | E&Y<br>सार्वजनिक बांधकाम विभाग<br>नाशिक महानगरपालिका |
| 11a | बेजे, टाकेद, कावनई बद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाने सादरीकरण केले. सदरचे आराखडे केवळ कुंभमेळ्याची गर्दी हाताळण्याबाबत तयार करावेत आणि ते स्थानिक धार्मिक सांस्कृतिक आणि नैसर्गिक परिस्थितीशी सुसंगत कसे होतील याबाबत अधिक पर्याय सादर करावेत. | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 12 | महानगरपालिका नाशिक प्रमाणेच राज्य शासनाच्या कार्यालयांच्या वतीने सल्लागार संस्थांची नेमणुक करावी. यासाठी प्रस्ताव तयार करावा. | जिल्हाधिकारी नाशिक |
| 13 | आतापर्यंत विविध विभागांकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन कुंभमेळ्यासाठी आत्यावश्यक कामांची यादी निश्चित करावी. | जिल्हाधिकारी नाशिक |

| अ.क्र | मा. अध्यक्ष यांनी बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| 14 | त्र्यंबकेश्वर येथील पर्यावरणाला बाधा पोचेल याप्रकारे जमिनींचा विकास आणि बांधकामे घेत असल्याच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच काही बांधकामे देखील सकृतदर्शनी नियमावलीच्या विपरित बांधल्याचे जाणवत आहे. याबाबत चौकशी करावी. | जिल्हाधिकारी नाशिक |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या, आणि त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 21-04-2025 17:28:58
(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.